

वर्ष ४८ वे

अंक ६ वा

१० जुन २०२६

किंमत १ रुपया

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

## स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली,
## मराठी अस्मिता जागवली !



# शिवराज्याभिषेक

## दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!



दि.०६ जुन



तिचे शौर्य पाहून शत्रू सैन्य थरथर कापले

तिने तलवारीच्या धारेवर स्वातंत्र्य राखले

मातृभूमीसाठी जिने दिले सर्वोच्च बलिदान


त्या झाशीच्या राणीचा आम्हाला आहे अभिमान

# राणी लक्ष्मीबाई

**यांना पुण्यतिथीनिमित्त**

**विनम्र अभिवादन !**

दि.१७ जुन



दि.२१ जुन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे

आद्य सरसंघचालक

# डॉ.केशव बळीराम हेडगेवार

यांना पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी अभिवादन!

# चित्तभूषण दालन- एक गौरवशाली परंपरा

**नुकत्याच साजऱ्या झालेल्या श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त आयोजित सोहळ्यात श्री परशुराम भवनामधील चौथ्या मजल्यावरील चित्तपावन ज्ञाती मधील महनीय व्यक्तींची तैलचित्रे असलेल्या दालनाचे उद्घाटन म.सा.प. अध्यक्ष श्री. योगेश सोमण यांच्या हस्ते झाले. त्यातील महनीय व्यक्तींबद्दल एक छोटा लेख प्रत्येक महिन्यात प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्यातील पहिला लेख..**

## थोरले बाजीराव पेशवे

सिन्नरजवळील डुबेरे या ऐतिहासिक गावात इ. स. १७०० मध्ये जन्मलेले थोरले बाजीराव पेशवे हे मराठा साम्राज्याच्या इतिहासातील सर्वात तेजस्वी, पराक्रमी आणि दूरदृष्टीचे सेनानी मानले जातात. त्यांचे पूर्ण नाव बाजीराव बल्लाळ भट असे होते. त्यांचे वडील बाळाजी विश्वनाथ हे छत्रपती शाहू महाराज यांचे विश्वासू पेशवे होते. वडिलांच्या निधनानंतर अवघ्या विसाव्या वर्षी शाहू महाराजांनी बाजीरावांना पेशवेपदाची जबाबदारी दिली. त्या काळात मराठा साम्राज्य अनेक संकटांनी वेढलेले होते. दक्षिणेत निजाम, उत्तरेत मुघल आणि इतर प्रादेशिक सत्तांचा धोका होता. अशा परिस्थितीत बाजीरावांनी आपल्या असामान्य युद्धकौशल्याने आणि चपळ नेतृत्वाने मराठ्यांचे सामर्थ्य संपूर्ण भारतभर पोहोचवले.

**युद्धकौशल्य आणि रणनिती :-**

थोरले बाजीराव हे घोडदळाच्या वेगवान हालचालींसाठी प्रसिद्ध होते. ''वेग, अचानक हल्ला आणि शत्रूला गोंधळात टाकणे'' ही त्यांची मुख्य युद्धनिती होती. त्यांनी पारंपरिक युद्धपद्धतीपेक्षा गतिमान आणि गनिमी शैलीचा प्रभावी वापर केला. त्यांच्या सैन्याचे वैशिष्ट्य म्हणजे कमी वेळात मोठे अंतर पार करणे आणि शत्रूवर अनपेक्षित आक्रमण करणे. थोरले बाजीराव पेशवे यांनी आपल्या २० वर्षांच्या कारकिर्दीत सुमारे ४१ मोठ्या लढाया लढल्या होत्या. विशेष म्हणजे, त्यांनी आपल्या आयुष्यातील एकही लढाई हारली नाही. त्यांच्या या अजिंक्य विक्रमामुळे आणि वेगवान युद्धतंत्रामुळे त्यांना इतिहासात 'रणधुरंधर' म्हणून ओळखले जाते. इतिहासकार त्यांच्या युद्धकौशल्याची तुलना जगातील महान सेनानींशी करतात.

**पालखेडची लढाई :-**

इ. स. १७२८ मधील नाशिक जवळच्या पालखेडची लढाई ही बाजीरावांच्या लष्करी प्रतिभेचे सर्वोत्तम उदाहरण मानली जाते. निजामाने मराठ्यांविरुद्ध मोठे सैन्य उभे केले होते. परंतु बाजीरावांनी थेट युद्ध न करता त्याच्या रसदपुरवठ्यावर हल्ले केले, सैन्याला वेढा घातला आणि निजमाला अडचणीत आणले. अखेर निजामाला तह करावा लागला. जगातील अनेक लष्करी अभ्यासकांनी या युद्धाचा अभ्यास ''मोबाइल वॉरफेअर'' चे उत्कृष्ट उदाहरण म्हणून केला आहे.

**उत्तर भारतातील मोहिमा :-**

बाजीरावांनी मराठा साम्राज्याचा विस्तार नर्मदेपलीकडे नेला. त्यांनी माळवा, बुंदेलखंड आणि दिल्लीपर्यंत मराठ्यांचा प्रभाव निर्माण केला. बुंदेलखंडचे राजा छत्रसाल बुंदेला यांना मुघल सरदारांपासून वाचवण्यासाठी बाजीरावांनी मदत केली. त्यांच्या या मोहिमेमुळे मराठ्यांचा प्रभाव उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर वाढला. इ. स. १७३७ मध्ये त्यांनी दिल्लीवर धडक मारून मुघल साम्राज्याला हादरा दिला. या मोहिमेमुळे मराठ्यांचे सामर्थ्य संपूर्ण भारताला जाणवले.

**नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व :-**

थोरले बाजीराव हे केवळ योद्धे नव्हते, तर कुशल संघटक आणि प्रेरणादायी नेते होते. त्यांनी शिंदे, होळकर, पवार, गायकवाड यांसारख्या मराठा सरदारांना एकत्र ठेवले. सैनिकांमध्ये मिसळून राहणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि युद्धात स्वतः आघाडीवर राहणे ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये होती. त्यांचे व्यक्तिमत्त्व धाडसी, निर्णयक्षम आणि राष्ट्रनिष्ठ होते. ''हिंदुस्थानात मराठ्यांचा झेंडा फडकला पाहिजे'' हे त्यांचे स्वप्न होते आणि त्यांनी ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आयुष्य वेचले.

थोरले बाजीराव पेशवे हे मराठा इतिहासातील अद्वितीय सेनानी होते. त्यांच्या युद्धनितीमुळे मराठा साम्राज्य भारतीय उपखंडातील प्रभावी सत्ता बनले. वेगवान युद्धशैली, धाडसी निर्णय आणि राष्ट्रहितासाठीची निष्ठा यामुळे त्यांचे नाव भारतीय इतिहासात अजरामर झाले आहे. सिन्नरजवळील डुबेरे ही भूमी त्यांच्या जन्मामुळे आजही अभिमानाने ओळखली जाते.

**- प्रा. दिलीप फडके**


## श्री. अजित कुंटे यांची संस्थेस रु. १२,५०,०००/- ची देणगी.

संस्थेचे सभासद श्री. अजित रामचंद्र कुंटे (बंगळुरु) यांनी त्यांचे वडील कै. रामचंद्र गोपाळ कुंटे (सर) यांचे स्मृतीप्रित्यर्थ रु. १२,५०,०००/- (बारा लाख पन्नास हजार) ची देणगी दिली आहे.

या आधी देखील त्यांनी रु. ५ लाखांची देणगी संस्थेस दिली आहे. श्री. अजित कुंटे यांचे संस्थेच्या वतीने मनःपूर्वक आभार.

***

## श्रीमती शुभदा दांडेकर यांची संस्थेस रु. एक लाखांची देणगी



श्रीमती शुभदा दांडेकर यांनी आपले पती कै. गोपालकृष्ण जगन्नाथ दांडेकर यांच्या स्मृती-प्रित्यर्थ संस्थेस रु. एक लाखाची देणगी दिली आहे.

या वेळी त्यांच्या कन्या सौ. वर्षा राजेश देशपांडे (विजय मोटार ड्रायव्हिंग स्कूल चे संचालक श्री. राजेश देशपांडे यांच्या पत्नी) या पण उपस्थित होत्या . देणगीचा स्वीकार संस्थेचे सल्लागार विश्वस्त श्री. विवेक गोगटे यांनी कार्यकारिणी सदस्य श्री. सुधीर दामले व श्री. अनिरुद्ध अभ्यंकर यांच्या समवेत केला.

सदर देणगी मिळवून देण्यासाठी सौ. शोभना दातार यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. श्रीमती दांडेकर यांचे मनःपूर्वक आभार आणि सौ. शोभना दातार यांना धन्यवाद.

***

## डॉ. सौ. साधना गोखले व श्री. सुधाकर भार्गवराम गोखले यांची संस्थेस देणगी

इंदिरा नगर स्टेट बँक कॉलनी येथे राहणाऱ्या डॉ. सौ. साधना सुधाकर गोखले व श्री. सुधाकर भार्गवराम गोखले यांनी संस्थेस रु. १५,०००/- ची देणगी दिली आहे. दर वर्षी सामुदायिक मौंजीसाठी ते संस्थेला देणगी देत असतात. श्री. श्रीरंग वैशंपायन यांच्या माध्यमातून ही देणगी मिळाली आहे. गोखले दांपत्याचे मनःपूर्वक आभार.

### स्नेहबंध चा जूनमधील कार्यक्रम - 'आपले आरोग्य - आपल्या हाती...'

**कांही ठराविक वयानंतर शारीरिक हालचाली हळूहळू व्हायला लागतात आणि मग त्याचे परिणाम आपल्याला सहन करावे लागतात... वाढत्या वयात शारीरिक हालचाली किती, केव्हा आणि कोणत्या योग्य पद्धतीने कराव्या; तसेच प्रत्येकाची कार्यक्षमता आणि आरोग्य टिकवून शरीराची कुवत बघून कशा पद्धतीने हालचाल करायची याविषयी आपण जाणून घेणार आहोत...**

**या कार्यक्रमात आपल्याला ह्या विषयी मार्गदर्शन करणार आहेत डॉ. निकिता पाठक (फिजिओथेरपिस्ट).**
**सर्व मैत्रिणींनी कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे...**

**ठिकाण :- श्री.परशुराम भवन. डॉ.लेले सभागृह.**
**दिनांक :- शनिवार, दि. २७ जून २०२६ वेळ :-संध्याकाळी ५.३० वा.**

### सवलतीच्या दरात वह्या- रजिस्टर उपलब्ध

संस्थेत वह्या/ रजिस्टर आलेली आहेत. संस्थेच्या ऑफिस वेळेत दिनांक ४ मे पासून विक्रीस उपलब्ध आहेत. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य. एका सभासदास जास्तीत जास्त २ डझन घेता येतील.

# आमचे दादा- श्री. रामचद्र गोपाळ कुंटे



'कुंटे सर' म्हणून ओळखले जाणारे विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणजे आम्हा मुलांचे (आशा-अजित) लाडके दादा!

सहकारी, मित्र यांच्यात 'रामभाऊ' अशी ओळख असलेले आमचे वडील, 'शिक्षक-प्रिय', 'विद्यार्थीप्रिय' असे तर ते होतेच; पण त्याबरोबरही कडक शिस्तीचे अशी त्यांची खास ओळख होती. गणित या अनेकांसाठी अवघड असलेल्या विषयाचे उत्तम रितीने अध्यापन करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे होते.

गणिताचे अध्ययन, अध्यापन व प्रसार हा व्यासंग त्यांनी आयुष्यभर जपला. निवृत्त झाल्यानंतरही आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी त्यांनी संगणक शिक्षण घेतले, स्वतःसाठी संगणक विकत घेतला इतरांनाही संगणकाचे शिक्षण दिले.

कुंटे सरांनी अनेक संस्थांसाठी कार्य केले त्यापैकी उदाहरणा-दाखल या काही संस्था :

✻ महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ व त्याचे मुखपत्र 'गणित शिक्षण' भारतीय - शिक्षण मासिक

✻ यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ

✻ भारतीय भारत इतिहास संकलन समिती

✻ अकोलकर मानसिक क्षमता शोधन संस्था'

✻ नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ येथे तर जवळ जवळ ९ वर्ष 'मानद सचिव' म्हणून काम केले.

✻ 'हुतात्मा अनंत कान्हेरे समिती' या कामाच्या निमित्ताने नाशिक जिल्हा त्यांनी अक्षरशः ढवळून काढला होता. अश्या अनेक संस्थांना त्यांनी आधार दिला होता. जणू काही आपले आयुष्यच या संस्थांसाठी समर्पित केले होते.

त्यांच्या अनेक गुणवैशिष्ट्यांपैकी महत्वाचे पैलू म्हणजे जीव तोडून, झोकून देऊन काम करणे, आचारात-विचारात प्रागतिकता, सुधारकीपणा, गणित सोपे करून शिकवण्याचे कौशल्य, स्वतः नवनवीन शिक्षण घेणे व इतरांनाही ते देणे, निःस्पृह वृत्ती, संघटना कौशल्य, प्रसिद्धी पराङ्मुख वृती!

त्यांच्या अशा या थोर कार्याची महती वर्णन करण्यास खरोखरीच शब्द अपुरे पडतील ! पण पुढच्या पिढीला त्यांच्या कार्याची ओळख व्हावी, त्याचा आवाका लक्षात यावा एवढा एकच उद्देश या मागे आहे. तसं पाहिलं तर त्यांच्या स्वभावाच्या अगदी विरुध्द आहे हे !

खूप खूप काम करायचे, कष्ट करायचे पण स्वतः पडद्यामागे राहायचे व आपले कार्य पुढे न्यायचे. तीच आपली ओळख असू द्यायची. अशा प्रकारचे कार्य करणारे ते होते. ही सर्व त्यांच्या कार्याची पध्दत. पाहता एवढेच म्हणावेसे वाटते...

मुद्रा सस्मित सुहास<br>
थारा जराही न आळसास ।<br>
श्वासाश्वासात उत्साहाचा वास<br>
धरिली अविरत ज्ञानदानाची कास ।<br>
सतत कार्यतत्परतेचा ध्यास<br>
युवकांनाही लाजवेल खास ।<br>
प्रेरणा देवो नित आम्हास<br>
हाच एक मनी ध्यास ।।

**- अजित रामचंद्र कुंटे**

---

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# देणगीदार - मे २०२६

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. अजित रामचंद्र कुंटे | १२,५०,०००/- |
| ०२ | श्रीमती शुभदा दांडेकर | १,००,०००/- |
| ०३ | डॉ. सौ. साधना व श्री. सुधाकर भार्गवराम गोखले | १५,०००/- |

# नाशिकचा रविवार कारंजा – एक अखंड प्रवाही चैतन्यदायी उर्जास्रोत

दि. १ जुलै २०२५ रोजी आमच्या घरासमोरील साठीच्या उंबरठ्यावर असलेल्या यशवंत मंडईवर अखेर हातोडा पडलाच व त्या ध्वनीने गेल्या पासष्ठ सत्तर वर्षातल्या 'रविवार कारंजा' या नाशिकचे हृदय असलेल्या परिसराबाबतच्या स्मृतींचा कल्लोळ मनात उमटला.

माझी पहिली आठवण ही मी सहा वर्षांचा असतानाची म्हणजे वर्ष १९५६ मधली. त्या वर्षी माझ्या आयुष्यातील पहिला सिंहस्थ/कुंभमेळा मी अनुभवला. रविवार कारंजाचे नाक असलेल्या आमच्या घराच्या पुढील हॉलच्या खिडकीत उभे राहून कारंजावरची 'गंमत' पाहणे हा आमच्या आता ८६ व्या वर्षात पदार्पण केलेल्या घरातील गेल्या चार पिढ्यांमधील सर्वांचा व विशेषतः मुलांचा आवडता कार्यक्रम. त्याप्रमाणेच मी खिडकीत खुर्चीवर उभा राहून कारंजावरची गंमत पाहत होतो.

त्या काळी सिंहस्थ सुरू व्हायच्या आधीच देशभरातील साधू महंत आपापले घोडे, हत्ती व उंट घेऊन शहरात दाखल होत व हत्तींवर बसून गावात व विशेषतः बाजारपेठेत फिरत. असाच एक साधू आपल्या हत्तीवर बसून, तेव्हा आमच्या घराच्या खालीच पेठे विद्यालय गल्लीच्या कोपऱ्यावर तेव्हा असलेल्या सब जेलला लागूनच असलेल्या दगडू तेल्याच्या तीन खणी दुकानासमोर उभा राहिला. (दगडू तेली हा एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे, तो नंतर येईलच). त्या वेळी दगडू तेल्याचे दुकान त्यांचे तीन पुत्र आदरणीय सुखलाल (अप्पा), हरीभाऊ व दत्तूनाना रोज आळीपाळीने चालवीत असत. दगडूतेल्याच्या दुकानाच्या पहिल्या मोठया खणात गल्ला असून तेथे अप्पा व इतर भाऊही त्यांच्या–त्यांच्या वेळी त्या ठिकाणी मांडा ठोकून त्या वर्दळीच्या दुकानातील कारभार हाकत बसलेले असत. तर तो हत्ती त्या साधूने दुकानाच्या पहिल्या खणासमोर उभा केला व जोरदार शंखनाद केला. त्या हत्तीने आपली सोंड बाहेरूनच गल्ल्याच्या बैठकीपर्यंत आत घातली. अप्पांनी गजराजास नमस्कार करून एक नाणे त्याच्या सोंडेत दिले व त्या हत्तीने ते उलट्या दिशेने सोंड वर करीत माहूत असलेल्या साधूच्या हाती सुपुर्द केले व हत्ती मार्गस्थ झाला.

रविवार कारंजावरील माझ्या आठवणीतले व तेव्हाच्या माझ्या बालमनावर कोरले गेलेले आजपर्यंत स्मृतीकोषात कायमचे दडून राहिलेले हे पहिले दृष्य ...

**लेखांक – १**

**लेखक – प्रमोद प्र. रानडे**




**यशवंत मंडई, रविवार कारंजा, नाशिक**

# आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त योग प्रात्यक्षिक व सराव

रविवार दि.२१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संस्थेच्या श्री परशुराम भवन येथील डॉ. लेले सभागृहात सकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत योग शिक्षक **श्री. प्रदीप मोडक** यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिबिर आयोजित करण्यात आले आहे, विशेष करून ज्येष्ठ नागरिक व महिला यांना अतिशय उपयुक्त अशा आसनांबद्दल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी अवश्य उपस्थित राहावे.







श्रीमती शुभदा दांडेकर यांच्याकडून त्यांचे पती कै.गोपालकृष्ण दांडेकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ संस्थेस देणगी स्वीकारताना संस्थेचे सल्लागार विश्वस्त श्री.विवेक गोगटे, कार्यकारिणी सदस्य श्री.सुधीर दामले व श्री.अनिरुद्ध अभ्यंकर




चित्तभूषण दालनातील
श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचे तैलचित्र




चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, स्टेट बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

## संस्थेची वेबसाईट :-

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.